सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाकरीता महाराष्ट्र राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत यशदा, पुणे येथे आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमाचे देयकासाठी रु.१,५०,३००/-इतक्या रक्कमेचा निधी वितरीत करणेबाबत

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्रशिक्षण २०१४/प्र.क्र.१६/५-स

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२.
तारीख: २५ मार्च, २०१४

वाचा :-

१) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.टिआरएन०९/प्र.क्र.३९/०९/१२अ, दि.२३.९.२०११
२) समक्रमांकाचा शासन निर्णय दि.१९/०३/२०१४
३) उप निबंधक, (परीक्षा व प्रशिक्षण),सहकारी संस्था,सहकार आयुक्त व निबंधक कार्यालय यांचे पत्र क्र.प.व.प्र/राज्य प्रशिक्षण धोरण /बजेट/२०१४ दि.२६/०२/२०१४
४) सहा.प्रकल्प संचालक तथा सत्र संचालक, सहकार प्रशिक्षण व संशोधन केंद्र, यशदा, पुणे यांचे पत्र क्र.सीसीटीआर/एसटीपी/सहकार खाते/प्र.का.२०१३ दि.१२/०२/२०१४

प्रस्तावना :-

सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधिन क्र.१ च्या अनुषंगाने अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याबाबतचे राज्य शासनचे प्रशिक्षण धोरण निश्चित झाले आहे.सदर धोरणानुसार मुख्य सचिवांच्या अध्यक्षेतेखाली राज्य प्रशिक्षण कृती दल स्थापन केले असून यशदा, पुणे ही शिखर प्रशिक्षण संस्था म्हणून कार्यरत राहणार आहे.त्याअनुषंगाने यशदा, पुणे येथे सहकार खात्यातील अधिकाऱ्यांसाठी दि.६ फेब्रुवारी, २०१४ ते ८ फेब्रुवारी,२०१४ या कालावधीत प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.सदर प्रशिक्षणासाठी झालेल्या रु.१,५०,३००/- रकमेचे देयक यशदा, पुणे यांचे कडून सादर करण्यात आले असून सदर निधी यशदा, पुणे यांना अदा करण्यासाठी सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था पुणे यांना उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.त्यानुषंगाने खालील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय -

सन २०१३-१४ या आर्थिक वर्षासाठी Expenditure of Training Policy या योजने अंतर्गत ३४५१ २९०६ या लेखाशिर्षाखाली करण्यात आलेल्या तरतुदीतून वरील रु.१,५०,३००/-इतका निधी मंजूर करण्यात येत असून सदर निधी पुढील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा-

अ.क्र.	लेखाशिर्ष	मंजूर निधी
१	मागणी क्र.व्ही-२, ३४५१ सचिवालयीन आर्थिक सेवा, ००३,सचिवालयीन आर्थिक सेवा (००) (०१), शासकीय कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण,५० इतर खर्च (३४५१ २९०६)	१,५०,३००/-

उपरोक्त परिच्छेद क्र.१ येथे उपलब्ध करुन दिलेला रु.१,५०,३००/-लक्ष (रुपये एक लक्ष पन्नास हजार तीनशे फक्त) निधीचा खर्च सन २०१३-१४ या चालू वर्षाच्या Expenditure of Training Policy अंतर्गत करण्यात आलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदी मधून भागविण्यासाठी सदर निधी सहकार आयुक्त व निबंधक यांना उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(रुपये लाखात)

अ.क्र.	विभागाचे नांव	सन २०१३-१४ करीता मंजूर निधी	नियंत्रण अधिकारी (क्ष)	आहरण व संवितरण अधिकारी (य)
१	२	३	४	५
१	सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग	४० (सुधारीत तरतुद)	श्री.गो.ना.रणखांबे, सहसचिव (क्षेत्रिय आस्थापना), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.	श्रीमती अ.अ.चुरी , कार्यासन अधिकारी, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

३ परिच्छेद क्र.२ येथील तक्त्यातील "क्ष" आणि "य" मधील रकान्यात दर्शविलेल्या अधिकाऱ्यांना संबंधित विभागाकरीता अनुक्रमे नियंत्रण अधिकारी व आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. या शासन निर्णयान्वये मंजूर एकूण रु.१,५०,३००/-इतक्या रक्कमेचा निधी श्री.गो.ना.रणखांबे, सहसचिव (क्षेत्रिय आस्थापना), यांना थेट अर्थसंकल्पीय प्रणालीव्दारे उपलब्ध करुन देण्यात येत असून त्यांनी सदर निधी परि.२ येथील तक्त्यामधील संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीव्दारे वितरीत करावयाचा आहे. आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी सदर निधी सहकार आयुक्त व निबंधक, पुणे यांना RTGS सुविधेव्दारे अदा करावेत.

४ सहकार आयुक्त व निबंधक यांनी यशदा,पुणे यांच्या संदर्भांकित क्र.४ येथिल प्रस्तावाच्या अनुषंगाने मंजूर निधीच्या मर्यादेतच विनियोग करावा.

५ या शासन निर्णयान्वये मंजूर निधीचा विनियोग आणि यासंदर्भातील अनुपालन अहवाल व निधी उपयोगिता प्रमाणपत्र सहकार आयुक्त व निबंधक, पुणे यांनी सादर करावे.

हा शासन निर्णय नियोजन व वित्त विभागाच्या मान्यतेने व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.९५/१४/व्यय-२, दि.३.३.२०१४ अन्वये प्राप्त झालेल्या मान्यतेनुसार व शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अंदाज२०१३/प्र.क.८५/अर्थसंकल्प-३ दि.२५/४/२०१३ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१४०३२५१७१२०५२९०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sunil Pandurang Pandhare

Digitally signed by Sunil Pandurang Pandhare
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Co-operation marketing and textiles department, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Sunil Pandurang Pandhare
Date: 2014.03.25 17:13:19 +05'30'

(सुनिल पांढरे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी सेस्था,पुणे
२. मा.मंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

३. मा.राज्यमंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. सचिव(सहकार), मंत्रालय, मुंबई यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
५. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
६. निवासी लेखापरीक्षा अधिकारी
७. अवर सचिव/कक्ष अधिकारी (१७-स/रोखशाखा/१२-स),स.प.व व. विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
८. कक्ष अधिकारी (व्यय-२), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
९. निवडनस्ती (५-स)